# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - ५०

---

### श्रीवर्धन (जि.रायगड) येथे पायी चालताना झालेल्या मृत्युबाबत

**(१) १३१३० (१३-०९-२०२०). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन (जि.रायगड) येथे कोरोना विषाणू प्रादुर्भावाच्या संकटकाळात पायी जाताना श्री. मोतीराम जाधव यांचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, राज्यात पायी चालत जाताना असे किती मृत्यू झालेले आहेत,
३) असल्यास, या मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या परिवारास शासनाने कोणती मदत केली वा करण्यात येत आहे ,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :**(१) होय, हे खरे आहे.
मौजे जिते, जि. रायगड येथे दिनांक १४/०५/२०२० रोजी उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी श्री. मोतीराम जाधव यांना मयत घोषीत केले. सदर बाबत दादर सागरी पोलीस ठाणे येथे आकस्मात मृत्यू रजि.नं.०४/२०२० सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे तक्रार दाखल करण्यात आली आहे.
(२) प्रस्तुत नमूद परिस्थितीप्रमाणे आकस्मात मृत्यू प्रकरणी राज्यात एकूण ३२ मृत्यू झाल्याची नोंद प्राप्त आहे.
(३) सदर बाबत महसूल, मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णय दि.१३.०५.२०१५, दि.२५.०१.२०१५ व दि.३०.०१.२०१४ मधील नमूद निकष, अटी व शर्तींमध्ये पायी चालताना झालेल्या मृत्यूच्या अनुषंगाने मदत अनुज्ञेय होत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी वसतिगृह सुरु करण्याबाबत

**(२) ३२४८५ (१२-०१-२०२२). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी वसतिगृहे उभारण्यास शासनाने मंजूरी दिली असल्याचे माहे जुन, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वसतिगृहे उभारण्यास किती कालावधी लागणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२३-०३-२०२२) :** (१) होय.
(२) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन निर्णय,क्र.बीसीएच-२०२०/प्र.क्र.२८६/ शिक्षण-२, दिनांक १५ जून,२०२१ अन्वये बीड, जालना, अहमदनगर या जिल्हयातील ऊसतोड कामगारांची संख्या अधिक असलेल्या तालुक्यांपैकी काही तालुक्याच्या ठिकाणी ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी प्रत्येकी १० याप्रमाणे २० वसतीगृहे मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.सदर वसतीगृहासाठी शासकीय इमारती बांधून सुरू करण्यास काही कालावधी लागणार असल्याने सद्यस्थितीत भाडेतत्वावरील इमारतीत वसतीगृहे सुरू करण्यास समाज कल्याण

आयुक्तालयाच्या स्तरावर परवानगी देण्यात आली असून वसतीगृहे सुरू करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात कोविड-१९ च्या संसर्गामुळे मृत पावलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याबाबत

**(३) ३२७२९ (०७-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कोविड-१९ च्या संसर्गामुळे दिनांक २३ मे, २०२० पर्यत एकूण ४९ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा मृत पावले पोलिसांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचे आश्वासित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत आतापर्यंत किती पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या वारसांना नियुक्त्या देण्यात आल्या वा येत आहेत, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) व (२) राज्यात कोवीड-१९ च्या संसर्गामुळे दिनांक २३ मे,२०२० पर्यंत मृत पावलेल्या एकूण २२५ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याच्या कार्यवाही सुरु असुन त्यापैकी आतापर्यंत ११९ वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्त्या देण्यात आल्या आहेत व उर्वरित नियुक्त्यांसंदर्भात नियमानुसार कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्ह्यातील पोलिसांची पदे रिक्त असल्याबाबत

**(४) ४०९७३ (१२-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शहराची लोकसंख्या, भौगोलिक क्षेत्र, गुन्हेगारी वाढत असताना कायदा व सुव्यवस्थाची जबाबदारी अपुऱ्या पोलिसांवर असून २७५ पोलिसांचे पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शहराचा वाढता व्याप लक्षात घेऊन येथे पोलिस आयुक्तालय स्थापन करण्याचा मागणीचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी आढावा घेऊन पोलिसांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत तसेच पोलिस आयुक्ताच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) नांदेड जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस अंमलदारांची एकूण ३५५३ पदे मंजूर असून त्यापैकी ३१५ पदे रिक्त आहेत.
(२) व (३) नांदेड येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाच्या स्तरावर सुरु असून सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक यांना कळविण्यात आले आहे.
पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या आस्थापनेवरील पोलीस नाईक, पोलीस हवालदार व सहायक पोलीस उपनिरीक्षक संवर्गाची पदे पदोन्नतीने भरण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच पोलीस शिपाई संवर्गाची १५५ व पोलीस शिपाई चालक संवर्गाची ३० रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात विशेषत: पनवेल तालुक्यात वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना त्रास होत असल्याबाबत**

**(५) ४४५९१ (०६-१०-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यात वाहतूक पोलिस विभागाच्या दुर्लक्षामुळे मोठ्या प्रमाणात होणा-या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांचे नुकसान होत असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील संबंधीत विभागामार्फत नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात दंड वसुल करण्याच्या कारवाईमुळे वाहतुक संबंधीच्या उपाययोजनांकडे तसेच बेकायदेशीररित्या पार्कींग केलेल्या वाहनांकडे दुर्लक्ष होत असून सततच्या वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून वाहतुक संबंधीच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष करणा-या संबंधीत विभागाच्या अधिका-यांवर कारवाई करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

पनवेल तालुक्यामध्ये पनवेल, नवीन पनवेल, कळंबोली, खारघर, तळोजा या वाहतूक शाखांचा समावेश होत असून पनवेल शहरामधील अरुंद रस्ते, जुन्या पनवेल परिसरातील रहिवाशी इमारतीमध्ये वाहने पार्क करण्यासाठी सुविधा नसणे तसेच कळंबोली भागात स्टील मार्केट असल्याने तसेच आजूबाजूचे परिसरात नागरी वस्तीत झालेली वाढ व त्याप्रमाणात पार्किंग सुविधा नसल्यामुळे वाहतूक कोंडी होते. कळंबोली येथे जड व अवजड वाहनांसाठी सिडको प्रशासनाचे दोन पार्किंग वाहनतळ असून त्यांची एकूण क्षमता ७०० वाहनांची आहे. सदर पार्किंग तळ क्षमतेचा विचार करता ती अत्यंत तुटपुजी असल्याने सदर परिसरामध्ये रोडवर पार्किंगची समस्या जाणवते.

वाहतूक शाखेकडून वेळोवेळी रोडवर पार्क केलेल्या वाहनांवर कारवाई केली जात असून उपाययोजना म्हणून नो पार्किंग, सम विषम पार्किंग करून वाहतूक सुरळीत ठेवण्यात येते.

(२) हे खरे नाही.

वाहतूक सुरळीत होण्यासाठी पनवेल तालुक्यातील वाहतूक शाखेमार्फत मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई केली जात असून अनधिकृतपणे पार्किंग केलेल्या वाहनांवर नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(३) वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी वाहतूक विभागाकडून खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या असून वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष दिसून येत नाही.

- वाहतुक सुरक्षा व वाहतूक नियमांचे पालन करण्याचे अनुषंगाने नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.
- वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी सर्व प्रभारी अधिकारी यांना वेळवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.
- वाहतूक विभागाकडून रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत पथनाट्य, कॅम्पस विथ हेल्मेट, वाहन चालक/मालक संघटनांच्या बैठकांचे आयोजन, शाळा-महाविद्यालये यांच्या भेटीचे आयोजन करण्यात येते.
- स्वातंत्र्याचा अमृत महोस्तव कार्यक्रमात लहान मुलांचे वाहतुक सुरक्षा या विषयावर चित्रकला स्पर्धा व वकृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## रायगड जिल्ह्यातील गाव पंचायती व जातपंचायतीचा वाढता जाच कमी करण्याबाबत

**(६) ४४९०१ (२८-१०-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक अधिनियम, २०१६ कायदा अस्तित्त्वात येवूनसुद्धा रायगड जिल्ह्यात गावकी व जातीच्या नावाखाली मानवी मुलभूत हक्कांवर पायमल्ली होऊन गावकी व जातपंचायतीचा जाच वाढल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कायदा आल्यानंतर गाव पंचायत व जातपंचायतीच्या प्रथा बंद होणे अपेक्षीत असताना सामाजिक बहिष्कारांचे ४५ गुन्हे दाखल असून ७४२ आरोपी निष्पन्न झाले, तसेच ६४८ आरोपींना वाळीत प्रकरणात अटक होऊन ३० जणांना जामिन मिळाला असून सर्व प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संबंधीत विभागाच्या अधिका-यांमार्फत सदर कायद्याची अंमलबजावणी काटेकोरपणे होत नसल्यामुळे गाव पंचायती व जात पंचायतीच्या जाचाचे प्रमाण वाढतच आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन गाव पंचायती व जातपंचायतीचा वाढत असलेला जाच १०० टक्के कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) पेण पोलीस ठाणे जि. रायगड कॉ. गु.रं.नं १४०/२०२० भा. द. वि. कलम ३८५, ५०४, ३४ सह महाराष्ट्र सामाजिक बहिष्कारापासून व्यक्तीचे संरक्षण अधि २०१६ चे कलम ३(१) (३) (४) ५, ७ प्रमाणे दिनांक २५/६/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(२) सन २०१७ ते २०२२ या कालावधीत सामाजिक बहिष्काराचे गुन्ह्यामध्ये ११७ आरोपी निष्पन्न झाले असुन १५ आरोपींना अटक झाली आहे. उर्वरीत आरोपीपैकी काही आरोपींना सी.आर.पी.सी. ४१(१) प्रमाणे नोटीसा देण्यात आल्या आहेत.

एकूण ११ गुन्ह्यापैकी ५ प्रकरणांची निर्गती करण्यात आली. ०५ प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत व ०१ गुन्हा पोलीस तपासावर आहे.

(३) व (४) पोलीस ठाणे स्तरावर गाव व जातपंचायत बाबत गावोगावी मिटींग घेवून त्यांना योग्य ते मार्गदर्शन करुन जनजागृती केली जाते. गावातील व गावकी पंच कमिटीने सामाजिक बहिष्कार घालण्याचे काम केल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्यास त्यांचेवर संबंधीत कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) पोलीस ठाण्याचे निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचा गैरप्रकाराबाबत

**(७) ४५६३४ (३१-१०-२०२२). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) येथील पोलीस ठाण्याचे निरीक्षक व सहाय्यक पोलीस निरीक्षक यांचा अनागोंदी कारभार सुरु असल्याचा आरोप करुन कार्यरत असलेल्या दोन्ही पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात याव्यात अन्यथा जनआंदोलन करण्यात येईल असा इशारा सर्व पक्षीय पदाधिकाऱ्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सर्वसामान्य नागरीकांसह सामाजिक संस्था व कार्यकर्ते यांना धाकदडपशाही करुन दादागिरी, शिवीगाळ सदर पोलीस अधिका-यांकडून करण्यात येत असून दारु विक्रीसह इतर अवैध गैरकारभारांना अभय देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाच्या तक्रारीनुसार चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) या आशयाचे निवेदन दि.२५.०४.२०२२ रोजी पोलीस अधिक्षक, सिधुदुर्ग यांना प्राप्त झाले आहे.
(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी, उप विभाग- सावंतवाडी यांनी सखोल चौकशी करुन दि.२१.०७.२०२२ रोजी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार कुडाळ पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी धाकदपटशाही, दादागिरी करत असल्याचे तसेच इतर अवैध गैरकारभारांना अभय देत असल्याचे निष्पन्न झालेले नाही. तथापी, अवैध दारुबाबतच्या एका प्रकरणी गुन्हा दाखल करणेस विलंब झाल्याने पोलीस निरीक्षक, कुडाळ पोलीस ठाणे यांना पोलीस अधिक्षक, सिंधुदूर्ग यांनी नाराजीपत्र दिले असून भविष्यात दक्षता घेण्याबाबत सूचीत केले आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

## उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये पाटबंधारे विभागाकडून ठराविक संस्थेस कामे वाटप होत असल्याबाबत

**(८) ४६३४८ (१०-११-२०२२). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग क्र.१, जि.उस्मानाबाद यांनी कळंब व उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील रुपये १ कोटी ६८ लक्ष किंमतीची १४ कामे मर्जीतल्या एकाच मजूर संस्थेस दिनांक ३१ मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये नियमबाह्यरित्या दिल्याचे दिनांक ७ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कायर्कारी अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे विभाग क्र. १, उस्मानाबाद यांनी अध्यक्ष, काम वाटप समिती व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जि.उस्मानाबाद यांच्याकडे जा. क्र. उपवि. क्र. १ उ'बाद/निविदा/लेख-३/१०३७, दिनांक ३१ मे, २०२२ व जा.क्र.उपवि. क्र. १ उ'बाद/ निविदा/लेख-३/१०३८, दिनांक ३१ मे, २०२२ नुसार सदर कामांची यादी सादर केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन नियमाप्रमाणे ३३:३३:३३ या प्रमाणात कामाचे वाटप होणे अभिप्रेत असताना व मंजूर कामाची यादी स्वतः वाटप समितीकडे पाठवणे नियमानुसार बंधनकारक असताना पदाचा गैरवापर करून मर्जीतल्या एकाच मजूर संस्थेचे लेटरहेड सोबत जोडून संस्थेच्या व्यक्तीला एवढ्या मोठ्या रकमेची कामे देण्याचे कारण काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू नियमबाह्य वाटप झालेल्या कामांमुळे जिल्ह्यातील इतर मजूर संस्था व बेरोजगार अभियंता यांच्यावर अन्याय झाला आहे, तसेच या प्रकारमुळे योग्य त्या वर्गातील सक्षम मजूर संस्था यासाठी निवडल्या जाणार नाहीत, कामाची प्रत राखली जाणार नसल्यामुळे पाटबंधारे विभाग, उस्मामानाबाद मार्फत गेल्या दोन वर्षात वाटप झालेल्या कामाची चौकशी करण्याची मागणी एका राजकीय पक्षाने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
कार्यकारी अभियंता,उस्मानाबाद पाटबंधारे विभाग क्र.१ ,उस्मानाबाद यांनी सन २०२२-२३ मध्ये रु.१ कोटी ४ लक्ष किंमतीची एकूण १४ कामे अध्यक्ष, जिल्हा काम वाटप समिती व जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांचे शिफारशीनुसार एकूण ५ मजूर सहकारी संस्थांना दिलेली असल्याने, मर्जीतल्या मजूर संस्थेस नियमबाह्यरित्या कामे देण्यात आलेली नाहीत.
(२) होय, हे खरे आहे.

(३) पावसाळापूर्व सन २०२२-२३ ची कामे तातडीने पूर्ण करण्याची आवश्यकता असल्यामुळे कार्यकारी अभियंता, उस्मानाबाद पाटबंधारे विभाग क्र.१ ,उस्मानाबाद यांनी सन २०२२-२३ मध्ये रु.१ कोटी ४ लक्ष किंमतीची एकूण १४ कामे अध्यक्ष, जिल्हा काम वाटप समिती व जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था उस्मानाबाद यांचे शिफारशीनुसार एकूण ५ मजूर सहकारी संस्थाना दिलेली आहेत.
(४) होय हे खरे आहे.
(५) कार्यकारी अभियंता यांना काम वाटपाचे अधिकार नसून ,ते जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ,काम वाटप समिती यांना आहेत . जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ,काम वाटप समिती यांनी शिफारस केलेल्या मजूर संस्थांना त्यांच्या शिफारस पत्रानुसार कार्यकारी अभियंता यांनी प्रचलित नियमानुसार कामे दिलेली असल्यामुळे ,याबाबत कार्यकारी अभियंता यांचेवर कार्यवाही करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली शहरातील सिग्नल व्यवस्था बंद असल्याबाबत

**(९) ४७३८१ (२७-१०-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली शहरातील सिग्नल व्यवस्था बंद असल्याने शहरातील वाहतुक व्यवस्था विस्कळीत झाल्याने वाहतुक कर्मचाऱ्यांवर मोठ्या प्रमाणात ताण येत असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी नांदेड नाका, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा चौक, जवाहर रोड आदी भागातील सिग्नलचा वापर केला जात नसून वाहतुकीच्या कोणत्याही नियमांचे पालन वाहन चालकाकडून केला जात नसल्याने सन २०२१ मध्ये हजारो वाहन चालकांवर कारवाई करुन लाखो रुपयांचा दंड वसुल केला आहे, परंतु सिग्नल यंत्रणा कार्यान्वित केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त जिल्ह्याची निर्मितीनंतर हिंगोली शहराची वाढ झपाट्याने होत असतानाही वाहतुक व्यवस्था सुरळीत नसल्यामुळे अनेक अपघात होऊन सर्वसामान्य नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) वाहतूकीचे उल्लंघन करून वाहतूकीस अडथळा करणाऱ्या वाहन चालकांविरुध्द मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येते.
तसेच हिंगोली शहरात सिग्नल चालू करणेबाबत नगर परिषद, हिंगोली कार्यालयास पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.
(३) हे खरे नाही.
हिंगोली शहर वाहतूक शाखेमार्फत सर्वसामान्य नागरिकांना वाहतूकीचे नियम, शिस्त लावणेकरीता प्रत्येक चौकामध्ये पोलीस अंमलदार नेमूण अपघाताचे प्रमाण कमी करण्यात आलेले आहे.
(४) अपघात कमी करण्याकरीता पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.
- प्रत्येक ३ महिन्यात अपघात रोखण्याकरीता, वाहतूकीचे नियम व शिस्त लावण्याकरीता वाहतूक शाखा व प्रादेशिक परिवहन विभागामार्फत संयुक्तपणे रस्ता सुरक्षा सप्ताह आयोजित करून जनजागृती करण्यात येते.
- वाहतूक शाखा व प्रादेशिक परिवहन विभागामार्फत वाहन चालकास मोटार वाहन कायद्यांतर्गत वेळोवेळी वाहतूकी संबंधाने जनजागृती करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ शहरात बनावट नोटांचा वापर चलनात करणाऱ्या टोळीला अटक केल्याबाबत**

**(१०) ४८५९६ (३०-१०-२०२२). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरात बनावट नोटांचा वापर चलनात करणाऱ्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दिनांक १० मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त टोळीकडून किती रुपयांच्या नोटा हस्तगत करण्यात आल्या, त्यानुसार बनावट नोटा चलनातून शोधून काढण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :**(१) व (२) होय, हे खरे आहे.

यवतमाळ शहरात काही इसम बनावट नोटा विक्री करीत असल्याचे आढळुन आल्याने त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे, यवतमाळ शहर येथे दिनांक ११.०५.२०२२ रोजी गु.र.क्र. ३०२/२२, भा.दं.वि. कलम ४८९(ब) (अ), १२०(ब), ३४ अन्वये गुन्हा नोंद करुन ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींकडून २०० रुपये दर्शविलेल्या एकूण १०८ बनावट चलनी नोटा जप्त करण्यात आल्या असून सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करून मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माजलगाव (जि.बीड) येथे धरणाच्या पात्रात फोटो काढण्यासाठी गेलेल्या पर्यटकाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(११) ४८८८६ (१४-१०-२०२२). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगाव (जि.बीड) येथे सेल्फिच्या मोहापायी तिघांचा धरणात बुडून मृत्यू झाल्याची घटना दिनांक ४ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू धरणाच्या पात्रात तिघेजण फोटो काढण्यासाठी गेले असता तोल जाऊन पाण्यामध्ये पडल्याची तसेच एकमेकांचा जीव वाचवण्याच्या प्रयत्नात तिघांचा बुडून मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त प्रकारच्या घटना रोखण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

वडवणी तालुक्यातील कवडगाव शिवारात, माजलगाव प्रकल्पाच्या बॅक वॉटरमध्ये तिघेजण पाण्यात उतरुन फोटो काढत असताना अचानक खोल पाण्याचा अंदाज न आल्याने तिघेही पाण्यात बुडाल्याने मरण पावले आहेत. तथापि, हि बातमी(खबर) देणाऱ्या व्यक्तीने चुकून माजलगाव प्रकल्पा ऐवजी जायकवाडी प्रकल्प नोंदविल्याचे निदर्शनास येत आहे.

(२) होय, हे खरे आहे

दि. २/४/२०२२ रोजी सेल्फी घेत असताना तिघेजण पाण्याचा अंदाज न आल्याने पाण्यात बुडुन मरण पावले आहेत.

(३) सदर घटनेची पोलीस स्टेशन वडवणी आ.मृ.क्र. १२/२०२२ कलम १७४ सी आर पी सी प्रमाणे दि. २/०४/२०२२ रोजी नोंद घेण्यात आली असून सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन यातील मयताचा पाण्यात बुडुन मृत्यू झाल्याबाबतचा अहवाल क्र. १३/२०२२ दि. २३/०५/२०२२ अन्वये तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार वडवणी येथे पाठविण्यात आलेला आहे, तसेच धरणावरील धोकादायक भागामध्ये जाण्यास मनाई असणारे फलक पुर्वीच लावण्यात

आलेले आहेत. अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी माजलगाव धरणाच्या बुडीत क्षेत्राच्या (बॅक वॉटर) लोकवस्तीच्या ठिकाणी सूचना फलक लावण्याबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वस्तीगृहे उभारण्याबाबत

**(१२) ४८८९१ (२०-०९-२०२२). श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यात एकूण ५०० वसतीगृहे असून त्यापैकी २०० पेक्षा अधिक वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत चालविण्यात येत असल्याचे दिनांक १० नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भाडेतत्वावरील पुर्ण केलेल्या २५ वसतीगृहांचे बांधकाम पुर्ण झाले असून उक्त वसतीगृहे सुरु करण्यात आले आहे काय, प्रगतीपथावर असलेल्या ४० वसतीगृहांचे बांधकाम पुर्ण झाले आहे काय, शासकीय जागेत प्रस्तावित असणाऱ्या ३३ वसतीगृहांची बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे, तसेच रामटेक येथील एकलव्य निवासी शाळा शासकीय इमारतीत स्थलांतरीत केले आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भाडेतत्वावरील इमारतीस निधी उपलब्ध करुन देऊन वसतीगृहाच्या इमारत बांधकामे हाती घेऊन तात्काळ वसतीगृहे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (०५-०९-२०२३) :** (१) व (२) आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी राज्यात सद्यस्थितीत एकूण ४९५ वसतीगृह कार्यरत आहेत. त्यापैकी २२० वसतीगृह शासकीय इमारतीत तर २७५ वसतीगृह भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत.

सद्यस्थितीत ५१ वसतिगृहांच्या इमातींची बांधकामे पूर्ण करण्यात आली असून या वसतिगृह इमारती वापरात आहेत. तसेच, २७ वसतिगृह इमारतींची बांधकामे प्रगतीत आहेत.

रामटेक येथील एकलव्य निवासी शाळा शासकीय जागेतील नवीन इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आलेली आहे.
(३) विभागास प्राप्त होणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्या टप्प्याने वसतिगृहांसाठी शासकीय जागेत इमारत बांधकामे हाती घेण्याचे नियोजित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईत सुरु असलेल्या बेकायदेशीर कामांची चौकशी करण्याबाबत

**(१३) ४९२४२ (०१-११-२०२२). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईत विविध ठिकाणी मटका, लॉटरी, जुगार, गोमांस तस्करी, अवैध दारु विक्री, डिझेल चोरी, गुटका विक्री करणे, बार व पब सुरु ठेवणे, मसाज पार्लरच्या नावाखाली देहविक्री, जेएनपीटीतील लालचंदन तस्करी यासारखे अनेक बेकायदेशीर कामे सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्यावर व हायवेवर रसायनांनी भरलेल्या शेकडो गाड्या अनधिकृतपणे पार्कींग केल्या जात असून पोलिस जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच चोरांचे प्रमाण, महिला अत्याचार, ऑनलाईन फसवणूक असे अनेक गुन्हे घडताना नवी मुंबई पोलिस आयुक्त तसेच वाहतूक विभागाचे उपायुक्त यांचे सर्व गोष्टीवर नियंत्रण नसल्याने अनधिकृत कारभाराची चौकशी करुन कारवाई करण्याबाबतचे निवेदन तत्कालीन विरोधी पक्षनेते, विधानसभा, तत्कालीन गृह मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त निवेदनाची चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार त्यात काय आढळून आले आहे व त्यानुसार संबंधित पोलिस आयुक्त तसेच वाहतूक विभागाचे उपायुक्त यांचेवर कारवाई करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :**(१) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अखत्यारीत मटका/जुगार, लॉटरी, गोमांस तस्करी, अवैध दारू विक्री, डिझेल चोरी, बायोडिझेल चोरी, गुटखा विक्री, विहीत वेळेच्या पुढे बार व पब सुरू ठेवणे, मसाज पार्लरच्या नावाखाली देहविक्री इ. बाबत सन २०२२ मध्ये २३१ गुन्हे दाखल करण्यात आले असून ७०० आरोपींना अटक करण्यात आली आहे.
(२) नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत अवैधरित्या पार्किंग करण्यात येणाऱ्या वाहनांवर वाहतुक विभागाकडून नियमितपणे कारवाई करण्यात येत असून, अशा कारवाई अंतर्गत सन २०२० ते सन २०२२ या कालावधीत १६१४६ कसुरदार टँकर चालक/मालक यांच्या विरुध्द कारवाई करून एकूण रुपये ३८,७९,३००/- इतक्या रक्कमेच्या दंडाची वसुली केली आहे.
तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडील वाशी-पनवेल या महामार्गावरुन वाहतूक नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृत पार्किंग करणाऱ्या खाजगी १८७७७ वाहनांधारकांविरुध्द सन २०२० ते सन २०२२ या कालावधीत कारवाई करून त्यांच्याकडून रुपये २७,०३,७००/- इतक्या रक्कमेच्या दंडाची वसुली केली आहे.
(३) व (४) होय.
सन्माननीय सदस्यांच्या दिनांक १९/०५/२०२२ रोजीच्या निवेदनातील उपस्थित मुद्यांच्या अनुषंगाने उपरोक्त उत्तर (१) व (२) सह नमूद करण्यात येते की, आयपीएल मॅचेस दरम्यान वाहतुक कोंडी अथवा इतर अनुचित प्रकार घडू नयेत, याकरीता नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून योग्य तो बंदोबस्त लावण्यात आलेला होता. तसेच सामन्यादरम्यान नवी मुंबई वाहतुक विभागाकडून वाहतुकीचे व पार्किंगचे नियोजन केले होते. तसेच वाहतुक कोंडीमुळे रुग्णवाहिका अडकण्याची परिस्थिती निर्माण झालेली नाही. यादरम्यान बंदोबस्तासाठी नेमलेले पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी इतर वेळी मूळ नेमणूकीचे ठिकाणी कर्तव्य बजावले आहे. तसेच इतर मुद्याबाबत वस्तुस्थिती दिसून आली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड जिल्हयातील ईसापूर धरणात असलेली ५८२ दलघमी पाण्याची तूट भरुन काढण्याबाबत

**(१४) ४९४०१ (१२-१०-२०२२). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयातील ईसापूर धरणात असलेली ५८२ दलघमी पाण्याची तूट भरुन काढण्यासाठी दिगडी उच्च पातळी बंधाऱ्यातून पाणी उपसाद्वारे ईसापूर धरणात टाकण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उर्ध्व पेनगंगा ते निम्न पेनगंगा प्रकल्पातील ५८२ दलघमी शिल्लक पाणी उच्च पातळी बंधाऱ्यातून उपसा करुन ईसापूर धरणात वळविणे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही कामांना उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचा भाग म्हणून मान्यता देण्याचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयाने दिनांक २१ डिसेंबर, २०२१ रोजी शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले तद्अनुषंगाने उपरोक्त कामांच्या मंजूरीचे आदेश निर्गमित होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०४-२०२३) :** (१) होय, खरे आहे.
(२) होय, खरे आहे.
(३) होय, खरे आहे.
(४) या बाबत मुख्य अभियंता जलविज्ञान, नाशिक या कार्यालयाकडून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची व तद्नंतर सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### गोरेगांव (मुंबई) येथील सिध्दार्थ रुग्णालयातील शवविच्छेदन केंद्र सुरु करण्याबाबत

**(१५) ४९७०५ (१८-०१-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोरेगांव (मुंबई) येथील सिध्दार्थ रुग्णालयातील शवविच्छेदन केंद्र गेल्या काही दिवसांपासून बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयातील मृतदेह शवविच्छेदनासाठी विलेपार्ले येथील कुपर किंवा बोरिवलीत भगवती रुग्णालयात न्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालयातील डॉक्टरांची पदे रिक्त असतांना ती तातडीने भरण्याबाबत शासनाकडून विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू शवविच्छेदन केंद्र तातडीने सुरु करण्याबाबत व डॉक्टरांची रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५ ) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
दिनांक ०९.०९.२०२२ ते दिनांक १२.०९.२०२२ या चार दिवसांसाठी सिध्दार्थ रुग्णालयातील शवविच्छेदनाचे काम विलेपार्ले येथील कूपर व बोरीवली येथील भगवती शवविच्छेदन केंद्र या कार्यालयाकडे तात्पुरत्या स्वरुपात वळविण्यात आले होते. तथापि, या कालावधीत सिध्दार्थ रुग्णालयातील उर्वरीत कामकाज सुरु ठेवण्यात आले होते.
(३) व (४) सिध्दार्थ रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ४ मंजूर पदांपैकी सद्य:स्थितीत ३ पदे भरण्यात आली असुन एक पद रिक्त आहे. हे एक पद भरण्याची कार्यवाही सुरु आहे. सिध्दार्थ रुग्णालय येथील शवविच्छेदनाचे कामकाज सद्य:स्थितीत सुरळीत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील वांद्रे परिसरात बनावट प्रतिज्ञापत्रे आढकून आल्याबाबत

**(१६) ४९८३० (१८-०१-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे परिसरात जवळपास ४ हजार ६८३ बनावट प्रतिज्ञापत्र सापडले असून त्यात बनावट स्टॅम्पपेपरचा वापर करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी निर्मलनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाअसून त्यानुसार सदरहू प्रकरणी किती दोषींना अटक करण्यात आली आहे,
(३) असल्यास, त्यानुसार सदरहू प्रकरणी चौकशी करुन शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१), (२) व (३)

फिर्यादी यांनी दिलेल्या माहितीनुसार बांद्रा कोर्टासमोर ४६२२ प्रतिज्ञापत्रे मिळून आल्याने प्रस्तुत प्रकरणी अज्ञात इसमांविरूध्द गु.प्र.शा. गु.अ.वि. गु.र.क्र. १९४/२२ भादंवि कलम ४२०, ४६५ अन्वये निर्मलनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.१०२४/२०२२ गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर नोटरीवाल्यांकडून ४६२२ प्रतिज्ञापत्रे ताब्यात घेण्यात आली आहेत. त्यापैकी एकूण १८३५ प्रतिज्ञापत्रांची पडताळणी करण्यात आली असून, त्यापैकी ०७ प्रतिज्ञापत्रे बनावट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## टुरिझम कंपनीची जाहिरात करण्याच्या नावाखाली घोडबंदर रोड (ठाणे) येथील नागरिकांची फसवणूक केल्याबाबत

**(१७) ४९८९१ (२७-०१-२०२३). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टुरिझम कंपनीची जाहिरात करण्याच्या नावाखाली घोडबंदर रोड (ठाणे) येथे राहणा-या निरंजन मुक्कामल्या यांची तब्बल २७ लाख ५० हजारांची फसवणूक झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कासरवडवली पोलीस ठाण्यात याबाबत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अद्यापही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आरोपीला अटक करण्यासंदर्भात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१), (२), व (३)

कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे शहर हद्दीत फिर्यादी यांना Telegram या ॲपवर आरोपी महिलेने टुरिझम कंपनीची जाहीरात व प्रमोशन केल्यानंतर त्याबदल्यात वर्कफ्रॉम होम करणाऱ्या मेंबर्सला योग्य मोबदला दिला जातो असे भासवून डिपॉझिटच्या नावावर पैसे भरायला लावून फिर्यादींस रु. २७,५०,७०५/- रकमेची ऑनलाईन फसवणुक केल्याप्रकरणी दिनांक १८/०९/२०२२ रोजी दोन आरोपींविरुध्द कासारवडवली पोलीस स्टेशन, ठाणे येथे गु.र.क्र. ३२७/२०२२, भा.द.वि. कलम ४२० सह कलम माहिती व तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (क) (ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हयातील आरोपीनीं वापरलेल्या फोनचे एस.डी.आर / सी.डी. आर. प्राप्त करण्यात आले आहेत. तसेच सदर गुन्ह्यात ज्या बँक खात्यावर पैसे वर्ग करण्यात आले आहेत, असे बँक खाते फ्रिज करून बँक खातेधारकांचा शोध घेण्यात येत आहे. त्याअनुषंगाने सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(४) घटनेची माहिती मिळताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## चिंचवाडी (ता. शहापूर, जि.ठाणे) येथे उंबराच्या खोऱ्यात घोंगडी धरण बांधण्याबाबत

**(१८) ५०७४७ (१८-०१-२०२३). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचवाडी (ता. शहापूर, जि.ठाणे) येथे उंबराच्या खोऱ्यात घोंगडी धरण बांधणे करिता सन २००४ ते २००८ मध्ये सर्वेक्षण झाले असून त्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी जमिन सिंचनाखाली येत नसल्याचा चुकीचा अहवाल सादर केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने घोंगडी धरण बांधणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
चिंचवाडी, ता. शहापूर, जि. ठाणे धरणाचा समावेश कोकण सिंचन विकास उच्चाधिकार समिती, भाग-२ मार्च १९८१ चे अहवालात भविष्यकालीन लघु पाटबंधारे योजना (संभाव्य अतिरिक्त स्थानिकस्तर लघु प्रकल्प) यात समावेश आहे.
(२) महाराष्ट्र शासन निर्णय क्र. आस्थाप २०१६/ प्र.क्र.८८(भाग-९)/जल-२,दि. ३१/०५/२०१७ अन्वये मृद व जलसंधारण विभागाचे कार्यक्षेत्र २५० हेक्टर वरून ६०० हे. पर्यंत वाढविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सदर प्रकल्पाचे सर्वेक्षण व बांधकामाबाबत कार्यवाही करणेसाठी क्षेत्रीय कार्यालयाकडून मृद व जलसंधारण विभाग यांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे महापालिका हद्दीतील दिवा येथील रेंटल इमारतीतील गैरव्यवहाराबाबत

**(१९) ५०९११ (१८-०१-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील ठाणे महापालिका हद्दीतील दिवा येथील एम एम आर डी ए च्या योजनेतील रेंटल सदनिका गैरव्यवहार प्रकरणी पोलिसानी दोन व्यक्तींच्या विरोधात गुन्हे दाखल केल्याचे माहे जानेवारी २०२२ मध्ये निदर्शनास आले हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास,सदर रेंटल इमारतीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत त्रयस्त समिती द्वारे सखोल चौकशी करून संबंधित दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) व (२)
ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत मुंब्रा पोलीस स्टेशनच्या हद्दीत शासकीय योजनेचा गैरवापर करून बनावट शासकीय कागदपत्राद्वारे सदनिका वाटपाचे बनावट आदेश वितरीत करुन लोकांची व शासनाची फसवणुक केल्याप्रकरणी सात जणांविरोधात दिनांक ३१/१२/२०२१ रोजी मुंब्रा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १२७१/२०२१ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
सदर गुन्हयामधील सात आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आलेले आहे.
(३) सदर प्रकरणातील गैरव्यवहाराबाबत त्रयस्त समिती नेमण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयात नोकरीचे अमिष दाखवून केलेली फसवणूक

**(२०) ५१२११ (१७-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हाधिकारी कार्यालयात नोकरी लावण्याचे अमिष दाखवून तिघांची अठरा लाख रुपयांची फसवणूक केल्याने माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान आर्वी पोलिस स्थानकांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली आहे व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :**(१) व (२) नाही.
जिल्हाधिकारी कार्यालयात नोकरी लावून देतो म्हणून रुपये १८ लाखांची फसवणूक केल्याबाबत बुलढाणा जिल्ह्यात तक्रार/गुन्हा दाखल नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बुलढाणा जिल्हयातील ठेवीदारांना परतावा देण्याचे अमिष दाखवून केलेली फसवणूक

**(२१) ५१२१५ (२३-०१-२०२३). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : तारांकित प्रश्न क्रमांक ४०२०९ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयातील ४ हजार २६९ ठेवीदारांना तब्बल ८ कोटी ६० लाख रुपयांना मोठया प्रमाणात परतावा देण्याचे अमिष दाखवून गरिमा रियल इस्टेट या कंपनीने फसवणूक केल्याची बाब माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आले आहे व त्यांचेवर कोणत्या कलमान्वये कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) होय.
गरिमा रियल इस्टेट ॲन्ड अलाईड लि. २) गरिमा होम्स ॲन्ड फार्म हाऊसेस लि.व ३)साथी मल्टीस्टेट क्रेडीट सोसायटी या वित्तीय संस्थेमार्फत व संस्थेचे संचालक व एजंट यांच्या मार्फत मोठ्या प्रमाणावर परतावा देण्याचे अमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन बुलढाणा शहर येथे दिनांक ६/२/२०१८ रोजी गु.र.क्र.७०/२०१८ भा.दं.वि. कलम ४०६,४२०,३४ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे ( वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ कलम ३ नुसार गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्हाच्या तपासामध्ये सुमारे ४५५२ ठेवीदारांची रु. ९.०४ कोटी एवढया रकमेची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे.
(२) सदर प्रकरणी ०२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. इतर ०४ आरोपींना धौलपुर राजस्थान येथून ट्रान्सफर कार्यवाही करुन अटक करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३)वित्तीय संस्थांविरूद्ध सोलापूर येथे दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र ठेवीदारांचे ( वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ मधील तरतुदींनुसार दि.१५.४.२०२१ च्या अधिसूचनेद्वारे आरोपींच्या व वित्तीय संस्थांच्या नावे असलेल्या मालमत्ता व बॅंक खाती जप्त करण्यात आली आहेत,

---

## अंबाजोगाई, जि. बीड. येथील महावितरणच्या विभागीय कार्यालयाला NSC योजने साठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(२२) ५२४२५ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केज, (जि. बीड) तालुक्यात शहरी व ग्रामीण भागातील नवीन ग्राहकांना घरगुत्ती वापरासाठी नवीन सेवा जोडणी (NSC) योजने अंतर्गत नवीन वीज जोडणी मिळण्याबाबतचे अर्ज महावितरणच्या उपविभाग कार्यालयात मोठ्याप्रमाणात प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजने अंतर्गत उपविभाग कार्यालया कडून तांत्रिक मंजुरी साठी विभागीय कार्यालयात अंदाजपत्रके सादर करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंबाजोगाई, जि. बीड. येथील महावितरणच्या विभागीय कार्यालयात सदर योजनेसाठी प्राप्त निधी संपुष्टात आल्याने अंदाजपत्रके सादर न करण्याचे कार्यकारी अभियंता, महावितरण, अंबाजोगाई यांनी सर्व उपविभागांना कळवले आहे. हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नवीन सेवा जोडणी (NSC) योजने अंतर्गत नवीन वीज जोडणी साठी निधी नसल्याने ग्राहकांची मोठी गैरसोय होणार असून सदर योजनेला निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उर्जा मंत्री यांच्याकडे दिनांक २० ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली होती, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त निवेदनांच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन योजनेसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२३) :** (१) हे अंशत:खरे आहे.
सन २०१९-२० ते २०२२ पर्यंत नवीन सेवा जोडणी (NSC) योजनेअंतर्गत अंबाजोगाई विभागासाठी रु.६.८७ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आलेली होती. अंबाजोगाई विभागातील १३५ ग्राहकांसाठी रु.१.५९ कोटी रक्कमेचे कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले असून, सदर कामे प्रगतीपथावर आहेत.सद्यस्थितीत ३४ वीज जोडण्या प्रलंबित आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
उपरोक्त विषयाबाबत कार्यकारी अभियंता, महावितरण, अंबाजोगाई विभाग यांनी दि.१७.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(४) हे अंशत: खरे आहे.
अंबाजोगाई विभागात नवीन सेवा जोडणी (NSC) योजनेअंतर्गत नवीन वीज जोडणीसाठीचे प्रस्ताव तसेच इतर अन्य प्रस्ताव प्रलंबित असून सदरील प्रस्तावांना मंजुरी देण्याबाबतचे लोकप्रतिनिधी यांचे दि.१८.०५.२०२२ चे निवेदन महावितरण कंपनीच्या मुख्य कार्यालयास प्राप्त आहे.
(५) सन २०२२-२३ मध्ये रु. ३ कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यापैकी रु. १ कोटीचा निधी सप्टेंबर महिन्यात व रु. २ कोटींचा निधी फेब्रुवारी २०२३ मध्ये अंबाजोगाई विभागास वितरीत केलेला आहे. सन २०२२-२३ मध्ये ३३४ नवीन वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. तसेच, सदर निधीमधून नवीन सेवा जोडणी (NSC) योजनेअंतर्गत नवीन वीज जोडणी मिळणेबाबतच्या प्रलंबित प्रस्तावांची कामे करण्याची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

---

## डोंगर शेवली (ता.चिखली,जि.बुलडाणा) येथील संग्राहक तलावाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२३) ५२८२४ (२२-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डोंगर शेवली (ता.चिखली,जि.बुलडाणा) येथील संग्राहक तलावाचे काम अठरा वर्षापूर्वी सुरु करण्यात आले होते हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संग्राहक तलावाचे काम अद्यापपर्यंत पूर्ण झाले नसून काम अतिशय निकृष्ट दर्जाच झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तलाव पूर्णत्वास आला नसताना आधी केलेली विविध कामे निकृष्ट दर्जाची झाल्याने पुणे येथील सफायर बिल्डर्स या कंत्राटदार कंपनीला पाटबंधारे विभागाने पुन्हा काम करण्यास सांगीतले असुन माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत ची मुदत दिलेली आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी काम प्रलंबित ठेवल्याने कंपनीवर कोणती दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे,
सदर प्रकल्पाच्या मुख्य धरणाचे काम विभागीय कार्यालयाचे कार्यारंभ आदेश क्रमांक ६६, दि.२/३/२००९ अन्वये मे.सफायर बिल्डर्स,पुणे यांना देण्यांत आले होते. तसेच प्रकल्पाची घळभरणी चे काम जून-२०१० अखेर पूर्ण झाले असुन पाणीसाठा व सिंचन निर्मिती झाली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे,
सांडवा, End sill, विमोचक विहीरीचा पोहोच पूल, अश्मपटल,धरण माथा रुंदी यामध्ये दुरुस्ती आवश्यक असल्याचे जानेवारी,२०१६ नंतर वेळोवेळी निदर्शनास आले.सद्यस्थितीमध्ये प्रकल्पाचे मुळ कंत्राटदार (मे.सफायर बिल्डर्स,पुणे) यांचे मार्फत सदरची निकृष्ट कामे समाधानकारकरित्या दुरुस्त करुन घेतल्याचे क्षेत्रिय अधिका-यांनी प्रमाणित केले आहे.
(३) होय, हे खरे आहे,
करारनाम्याअंतर्गत प्रकल्पाची उर्वरित कामे व निकृष्ट कामाची दुरुस्ती करण्यासाठी कंत्राटदारास माहे डिसेंबर-२०२२ पर्यतची मुदतवाढ देण्यांत आली होती.
(४) सद्यस्थितीमध्ये कंत्राटदाराने निकृष्ट कामाची दुरुस्ती/पुनर्बांधणी करुन दिलेली असून कंत्राटदारामार्फत पूर्ण कामे समाधानकारकरित्या करुन दिलेली असल्याने दंडात्मक कारवाई केलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पोलीस चाचण्यांमध्ये पात्र असूनही महिला पोलीस चालक उमेदवारांना नियुक्त्या न दिल्याबाबत**

**(२४) ५३२३० (२५-०१-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने महिला पोलीस शिपाई चालक भरती,२०१९ या अंतर्गत चालक शिपाई पोलीस भरती प्रक्रिया दिनांक ३० नोव्हेंबर,२०१९ रोजी राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पोलीस भरती प्रक्रियेतील २५ महिला उमेदवार, मैदानी चाचण्यांसह वाहनचालक चाचण्यांमध्येही पात्र ठरल्या असतांनाही त्यांची नांवे गुणवत्ता यादीतून वगळण्यांत आली असल्याचे दिनांक ०१ नोव्हेंबर,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास,मागील दहा महिन्यांपासून या महिला उमेदवारांनी शासनास विनंती करुनही न्याय न मिळाल्यामुळे आझाद मैदान, मुंबई येथे उपोषण सुरु केले असल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार प्रतिक्षेत असलेल्या या २५ महिला चालक नियुक्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,
(२) हे खरे नाही,
पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) २०१९ च्या तरतूदीनुसार पोलीस शिपाई चालक भरती प्रक्रिया पार पाडण्यात आली असून त्यामध्ये काही महिला उमेदवार ह्या कौशल्य चाचणीमध्ये उत्तीर्ण झाल्या परंतु शारिरीक चाचणीमध्ये अनुत्तीर्ण झाल्या होत्या. सदर सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार सदर महिला उमेदवार या अपात्र असल्याने अंतीम गुणवत्ता यादीतून त्यांची नावे वगळण्यात आली आहेत.
(३) होय
(४) उपोषणास बसलेल्या महिला उमेदवार यांना सेवाप्रवेश नियमातील तरतूदी व वस्तुस्थिती अवगत करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यात हिंगोली जिल्ह्यात लोन ॲपच्या माध्यमातून कर्ज घेतलेल्या अनेकांची फसवणूक होत असल्याबाबत

**(२५) ५३३६९ (२४-०१-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात लोन ॲपच्या माध्यमातून कर्ज घेतलेल्या अनेकांची फसवणूक होत आहे मात्र तक्रारी येत नसल्याने गुन्हाही दाखल होत नसल्याने पोलीस विभागाला कोणतीही कारवाई करता येत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन ॲप च्या माध्यमातून फसवणूक टाळण्यासाठी अशा ॲपवर शासनाने कोणती निर्बंध घातले आहेत काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ॲपच्या माध्यमातुन फसवणूक टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१), (२) व (३)

हिंगोली जिल्हयात लोन ॲपच्या माध्यमातून फसवणूक झाल्याबाबत एकही गुन्ह्या नोंद नाही.

तथापि, लोन ॲप च्या संदर्भाने फसवणूक झाल्यास, विनाविलंब जवळील पोलीस स्टेशन अथवा सायबर सेल येथे तक्रार देण्याकरिता नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. आणि सायबर सेल व पोलीस स्टेशन मार्फत वेळो वेळी सायबर फसवणुकी संदर्भाने नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पोफळणी( ता.कळंब जि.यवतमाळ) येथील दिवासी आदिम जमात (कोलाम) समाजातील युवक बेपत्ता झाल्याबाबत

**(२६) ५४२१४ (२४-०१-२०२३). डॉ.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोफळणी (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील आदिवासी आदिम जमात (कोलाम) समाजातील कु. ऋशभ देविदास टेकाम वय २१ वर्ष हा युवक दिनांक १४ सप्टेंबर, २०२२ रोजी गावातुन बेपत्ता झाला असल्याने त्यांच्या नातेवाईकाने दिनांक १६ सप्टेंबर, २०२२ रोजी पोलीस स्टेशन कळंब जि.यवतमाळ येथे तक्रार दिली होती परंतु दोन महिन्याच्या कालावधीत सबंधीत यंत्रनेने कुठलाही तपास लावला नसल्याने पोलीस प्रशासना विरोधात आदिवासी कोलाम समाज संघटनाने दिनांक ३० ऑक्टोबर, २०२२ रोजी तहसिल कार्यालयावर मोर्चा नेला असल्याचे दिनांक ११ नाव्हेंबर, २०२२ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेपत्ता झालेल्या युवकाच्या कुटूंबातील एका सदस्यांनी संशयीत व्यक्तीबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती परंतू पोलीस विभागाने त्यांची तक्रार घेतली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीन महिन्याचा कालावधी होऊन आदिवासी कोलाम समाजीतील बेपत्ता युवकाचा शोध पोलीस विभागाला लावता आला नसल्याने आदिवासी समाज बांधवानी मोर्चाच्या माध्यमातुन इतरत्र यंत्रणे कडुन चौकशी करण्यात यावी अशी मागणी केली हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बेपत्ता युवकांचा शोध लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबांची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :**(१) दिनांक १६.०९.२०२२ रोजी प्राप्त फिर्यादीवरून कु. वृषभ देविदास टेकाम, वय २१ वर्ष रा. पोफळणी हा दिनांक १४.०९.२०२२ पासुन बेपत्ता असल्याची तक्रार पो.स्टे. कळंब येथे मिसींग

क्रमांक ३२/२०२२ अन्वये प्रकरण दाखल करुन बेपत्ता इसम वृषभ टेकाम याची शोध पत्रिका काढण्यात आली. तसेच, पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात व जिल्हयाच्या बाहेर सुध्दा शोध घेण्यात आला. परंतु बेपत्ता इसम वृषभ याचा शोध न लागल्याने आदिवासी कोलाम संघटनेने तहसिल कार्यालय, कळंब येथे मोर्चा नेला होता.
(२) हे खरे नाही. बेपत्ता युवक वृषभ टेकामच्या आईने दिनांक १०.१०.२०२२ रोजी पो.स्टे. कळंब येथे येवून संशयीत व्यक्तीविरोधात तक्रार दिल्याने तक्रारीची त्वरीत दखल घेऊन पो.स्टे. कळंब येथे अप.क्र ७९७/२२ कलम ३६४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंद करुन तपास सुरू करण्यात आला. तपासादरम्यान संशयीत आरोपीस अटक करण्यात आली असून आरोपीची नार्को टेस्ट होणे करीता मा. न्यायालयास परवानगी मागण्यात आली आहे.
(३) होय. कोलाम संघटनेच्या मागणीस अनुसरून कु. वृषभ टेकाम या युवकाचा शोध घेण्याकरिता उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ यांचे अध्यक्षतेखाली तपास पथक गठीत करण्यात आले असून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाव्दारेसुध्दा त्याचा शोध घेण्यात येत आहे.
(४) उपरोक्त (१) व (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे तक्रार दाखल करून घेण्यात आल्या आहेत.
सदर प्रकरणी नेमलेल्या तपास पथकाने विविध पोलीस स्टेशनच्या वॉटसअ‍ॅप ग्रुप व ई-मेलवर शोध पत्रिका प्रसारीत केली असून बेपत्ता इसमाच्या मोबाईलचे एस.डी.आर व सि.डी. आर काढून संशयीत लोकांकडे विचारपुस केली आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इटग्याळ व भासवाडी (ता.मुखेड, जि.नांदेड) येथील लेंडी प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या गावांच्या पुनर्वसनात झालेला गैरव्यवहाराबाबत

**(२७) ५४५४६ (२६-१२-२०२२). श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) इटग्याळ व भासवाडी (ता.मुखेड, जि.नांदेड) या लेंडी प्रकल्पामुळे बाधित झालेल्या गावांचे पुनर्वसनात गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावांचे पुनर्वसन करताना कामांचा दर्जा न तपासताच संबंधित कंत्राटदारास देयके अदा करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,त्यानुसार उक्त प्रकरणी कंत्राटदारावर व संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-०२-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद आणि जालना जिल्हयातील प्रलंबित प्रकल्प पुर्णत्वास नेण्याबाबत

**(२८) ५४८०७ (२७-०१-२०२३). श्री.प्रदीप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद आणि जालना जिल्हयातील अनेक प्रकल्प अर्धवट भूसंपादन, गावाच्या पुनर्वसनासाठी योग्य नियोजन न केल्याने प्रलंबित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे देवगाव रंगारीचा तलावही प्रलंबित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०८-२०२३) :**(१)अंशत: खरे आहे.
औरंगाबाद जिल्ह्यातील देवगाव रंगारी बृ.ल.पा. या प्रकल्पाची पुनर्वसन प्रक्रिया पूर्ण न झाल्याने तसेच शेतकऱ्यांच्या विरोधामुळे सांडव्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. तसच जालना जिल्ह्या अंतर्गत हातवण बृलपा, ता. जालना, बरबडा बृलपा ता. मंठा, खोराडसावंगी ल. पा., ता. मंठा, पाटोदा सा. त., ता. मंठा, पळसखेडा बृलपा ता. भोकरदन हे प्रकल्प पुनर्वसना बाबत येणा-या अडचणीमुळे अद्याप पुर्ण होऊ शकले नाही. तथापि, सदर प्रकल्पामुळे बाधित होणा-या गावांचे पुनर्वसन करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही प्रगतीत आहे.
(२)होय, हे खरे आहे.
(३)देवगाव रंगारी बृ.ल.पा. प्रकल्पाचा समावेश केंद्र शासनाच्या बळीराजा जल संजिवनी योजना (BJSY) यामध्ये करण्यात आलेला आहे. या पूर्वी या प्रकल्पाची घळभरणी सन-२००५ मध्ये पूर्ण होऊन ३० टक्के पाणीसाठा करण्यात आलेला आहे. या प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये कानडगाव बाधित होत असून या बाधित कानडगाव चे पुनर्वसन करण्यासाठी जमीन उपलब्ध होत नव्हती. परंतू, आता या पुनर्वसनसाठी सन-२०२१ मध्ये थेट खरेदीने संपादन करण्यात आलेले असून या गावठाणातील नागरी सुविधांची कामे सुमारे ८० टक्के पूर्ण झालेली आहेत. कानडगावच्या भूसंपादन व घरांचा मोबदला देण्यासाठीच्या दर निश्चितीच्या प्रस्तावास जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या जिल्हास्तरीय समिताने दि.१०/११/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे व त्या अनुषंगाने जून-२०२३ अखेर सदरची प्रक्रीया थेट खरेदीव्दारे संपादन करण्याचे नियोजित केले आहे. तसेच पुनर्वसन करावयाच्या नवीन गावठाणामध्ये नगर रचना व जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्या मान्यतेने प्रत्यक्ष जागेवर भूखंड आखण्यात आलेले असून भूखंड वाटपासाठी उपविभागीय अधिकारी, कन्नड यांच्या अध्यक्षतेखाली दि.१५/११/२०२२ रोजी समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. या समितीची बैठक दि.१६/०३/२०२३ रोजी बाधित शेतक-यां सोबत झाली असून भूखंड वाटपाची प्रक्रीया जूलै-२०२३ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. पुनर्वसन न झाल्यामुळे या प्रकल्पाचे सांडव्याचे बांधकाम साखळी क्र. ३१७७ ते ३२६७ या भागामध्ये २.६० मी. ने कमी ठेवण्यात आले होते. त्यामुळे प्रकल्पामध्ये आज पर्यंत ३० टक्के पाणीसाठा होत आहे. आता भूखंड वाटपाची प्रक्रीया गतीमान करुन बाधित कुटुंबांना नवीन पुनर्वसीत गावठाणमध्ये स्थलांतरीत करुन बांधकाम डिसेंबर-२०२३ पर्यंत पूर्ण करुन प्रकल्पामध्ये १०० टक्के पाणीसाठा निर्माण करण्याचे नियोजन केले आहे.
(४) भुसंपादन, पुर्नवसन विषयक अडचणी असल्यामुळे विलंब झालेला आहे. प्रकल्पास सु.प्र.मा. घेण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे.

---

## दुरदर्शन मालिकेतील अभिनेत्री तुनिषा शर्मा हिने केलेली आत्महत्या

**(२९) ५६६२५ (३०-०४-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दुरदर्शन मालिकामधील अभिनेत्री तुनिषा शर्मा हिने दुरदर्शन मालिकेच्या चित्रीकरणादरम्यान दिनांक २४ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास फाशी घेऊन आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत पोलिसांनी तिचा सहकलाकार शीजान खानला अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर घटना ही लव जिहाद ची केस असण्याच्या संशयावरुन पोलिस याबाबत तपास करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने लव जिहादचा प्रकार रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. सदर आत्महत्या प्रकरणी वालीव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१३५९/२०२२ भा.दं.वि.स. कलम ३०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यामध्ये मयत अभिनेत्री तुनिषा शर्मा हिचा सहकलाकार शीजान खान ला अटक करण्यात आली आहे.
(३) व (४) सदर घटनेच्या पोलीस तपासा दरम्यान सदर प्रकरणामध्ये लव जिहाद चा प्रकार आढळून आलेला नाही.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

### पुणे शहर आणि जिल्ह्यातील वीज ग्राहकांना विलासराव देशमुख अभय योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(३०) ५६६४५ (३०-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर आणि जिल्ह्यातील वीज जोडणी खंडित केलेल्या घरगुती किंवा औद्योगिक वीज ग्राहकांना विलासराव देशमुख अभय योजनेअंर्तगत देयकावार व्याज आणि दंड माफ करण्यासंदर्भातील अनेक प्रकरणे अद्यापही प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महावितरणच्या पुणे विभागाकडे प्राप्त झालेल्या लाभेछुक घरगुती व औद्योगिक ग्राहकांचा दिनांक १९ जानेवारी, २०२३ अखेर तपशील काय आणि त्यापैकी किती प्रस्तावांना मान्यता देण्यात आली, तसेच त्यातून मिळालेल्या महसुलाचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित प्रस्तावांस मान्यता मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) पुणे जिल्हयात विलासराव देशमुख अभय योजनेअंतर्गत लाभेछुक घरगुती व औद्योगिक प्रकारचे एकूण ३,०३१ ग्राहकांचे अर्ज मंजूर करण्यात आले व उर्वरित अर्ज योजनेच्या निकषात न बसल्याकारणाने नामंजुर करण्यात आले. मंजूर करण्यात आलेल्या ग्राहकांकडून रु.६.९९ कोटीचा महसुल प्राप्त झाला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हडपसर (जि.पुणे) तालुक्यात उच्चदाब विदयुत वाहिनीचा धक्का लागून व्यक्तीचा मुत्यु झाल्याबाबत

**(३१) ५६६५४ (३०-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हडपसर (जि.पुणे) तालुक्यातील श्रीराम चौकातील बोराच्या झाडावर बोरं खाण्यासाठी चढलेल्या व्यक्तीचा उच्चदाब विदयुत वाहिनीला धक्का लागून जागेवर मृत्यू झाल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले , हे खरे आहे काय ,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने अपघाताची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्याअनुषंगाने मृत व्यक्तीच्या कुटंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, वारंवार होत असलेल्या अशा अपघातांना आळा घालण्यासाठी शासनाकडून कोणत्या स्वरुपाची प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
दि. १०.०१.२०२३ रोजी श्री. जुनैद शब्बीर शेख ही व्यक्ती श्रीराम चौकातील अनधिकृतरित्या उभारलेल्या चिकनच्या

टपरीच्यावर शेजारील बोराच्या झाडाची बोरे काढण्याकरीता चढले असता त्या भागातून जाणाऱ्या २२ के.व्ही. हंडेवाडी या उच्चदाब वाहिनीच्या संपर्कात येऊन विद्युत भारीत झाले. तदनंतर ते मृत घोषित झाले.

(२) सदर अपघात प्रकरणी विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षण विभाग, पुणे यांनी दिनांक १२.०१.२०२३ रोजी घटनास्थळाची तपासणी करुन चौकशी केली आहे.

(३) सदर अपघातप्रकरणी विद्युत निरीक्षक, पुणे यांनी चौकशी केली व त्याचा अहवाल दिनांक २७.०२.२०२३ रोजी महावितरण कार्यालयास प्राप्त झाला. सदरील निकषानुसार श्री. जुनेद (जुनेर) शब्बीर शेख हे दिनांक १०.०१.२०२३ रोजी अनाधिकृतरित्या उभारलेल्या मटणाच्या दुकानाच्या पत्र्यावर चढून दुकानाशेजारील झाडाची बोरे काढत असताना त्यांचा संपर्क अनावधानाने सदर विद्युतभारीत २२ के.व्ही उच्चदाब उपरी तार मार्ग वाहिनीच्या वाहकास (बी फेज) झाला व त्यामुळे फ्लैश ओव्हर होऊन श्री. जुनेद (जुनेर) शब्बीर शेख यांना भाजले गेले व प्राणांतिक अपघात झाला. सदरील दुर्घटनेबाबत विद्युत निरीक्षक यांनी नुकसान भरपाईसाठी कोणालाही जवाबदार घरलेले नाही. तसेच त्या मृत व्यक्तीच्या कुटुंबियांनी आर्थिक मदतीसाठी विभागीय किंवा उपविभागीय कार्यालयास संपर्क साधलेला नाही अथवा तसा अर्ज दाखल केलेला नाही.

(४) सदर अपघाताच्या ठिकाणची उच्चदाब वाहिनी भूमिगत करण्यात आलेली आहे. तसेच अशा प्रकारच्या अपघाताप्रवण स्थळाची वेळोवेळी तपासणी करुन देखभाल व दुरुस्ती अंतर्गत आवश्यकतेनुसार विविध प्रकारच्या कामाच्या उपाय योजना करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सावंतवाडी ( जि.सिंधुदुर्ग ) मधील सरमळे धरण प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(३२) ५६६५७ (२७-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) मधील सरमळे धरण प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असताना बंद पडल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम अपूर्णावस्थेत राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू काम पूर्णत्वास नेण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.

सावंतवाडी तालुक्यातील सरंबळा मध्यम प्रकल्पाचे काम सन २००७ पासून ते आजमितीस बंद आहे.

(२) प्रकल्पाचे काम मुख्यत्त्वे वनप्रस्तावास मान्यता व पुनर्वसन गावठाणास प्रकल्पग्रस्तांकडून संमती प्रलंबित असणे तसेच कामे सुरु करण्यास स्थानिकांचा विरोध यामुळे अपूर्णावस्थेत आहे.

(३) १. प्रकल्प कामाच्या भुसंपादनासाठी लागणा-या वनप्रस्तावाच्या अंतिम मान्यतेची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

२. पुनर्वसन गावठाणांकरिता जागा पाहणी करणेत आलेली असुन प्रकल्पग्रस्तांकडून संमती मिळणेसाठी कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

३. वनशक्ती पब्लिक ट्रस्ट व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल केली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाअंती काम पूर्ण करणे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिन्नर शिर्डी महामार्गावरील मिरगाव फाट्याजवळ भरधाव ट्रॅव्हल्स आणि ट्रकचा अपघात झाल्याबाबत**

**(३३) ५६६८५ (०८-०५-२०२३). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सरोज आहिरे (देवळाली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर शिर्डी महामार्गावरील मिरगाव फाट्याजवळ भरधाव ट्रॅव्हल्स आणि ट्रकची समोरासमोर धडक झाल्याने १० लोकांचा झोपेतच मृत्यू झाला असून एकूण या घटनेत ३० जण गंभीर जखमी झाले असल्याचे दिनांक १४ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, सदर अपघाताच्या घटनेची चौकशी शासनाने केली आहे काय ,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने अपघातात प्राण गमावलेल्या व जखमींच्या परिवाराना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि.१३ जानेवारी, २०२३ रोजी सिन्नर शिर्डी रोडवर पाथरे शिवारात झालेल्या अपघातात १० लोकांचा मृत्यू झाला असून ३० जण गंभीर जखमी झाले आहेत.

(२) सदर अपघाताच्या अनुषंगाने वावी पोलीस ठाणे येथे ट्रक चालकाविरुध्द गु.र.नं.१७/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३०४(अ), २७९, ३३७, ३३८, ४४२ सह मो.वा.का.कलम १८७, १३४/१७७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) सदर अपघातात मृत्यू पावलेल्या प्रत्येक व्यक्तींच्या कुटूंबियांना ५ लाख रुपये व जखमींवरील उपचाराकरीता एकूण २० लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली आहे.

तसेच मा.पंतप्रधान निधीतून ५० लाख रुपये मदत प्राप्त झाली असून ९ मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या वारसांना एकूण रु.४५ लाख रुपये देण्यात आलेले असून १ मयत व्यक्ती ओरिसा राज्यातील रहिवाशी असून त्यांच्या वारसाचा तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अर्थ व सांख्यिकी विभागातील पदे रद्द केल्याबाबत**

**(३४) ५६७४३ (०८-०५-२०२३). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या नियोजनबद्ध विकासासाठी सामाजिक, आर्थिक तसेच मूलभूत व पायाभूत क्षेत्रातील सांख्यिकी माहिती उपलब्ध करून देणारा तसेच दर वर्षी आर्थिक पाहणी अहवाल सादर करून राज्याच्या लेखाजोखा मांडणारा अर्थ व सांख्यिकी विभागच सध्या अडगळीत पडल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभागातील काही पदे शासनाकडून रद्द केल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहु पदे रद्द करण्यामागची कारणे काय आहेत तसेच रद्द करण्यात आलेली पदे पूर्ववत भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (२५-०८-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे नाही,

मात्र अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांमधून भरल्या जाणाऱ्या शासनाच्या इतर विभागातील व त्यांच्या अधिनस्त कार्यालयांतील सांख्यिकी कक्षाकरिता मंजूर असलेली काही पदे कमी अथवा व्यपगत झाल्याचे निदर्शनास आल्याने नियोजन विभागाच्या दि. १६ जानेवारी, २०२३ च्या अर्धशासकीय पत्राद्वारे सर्व प्रशासकीय

विभागांना त्यांच्या विभागातील तसेच त्यांच्या अधिनस्त कार्यालयांतील सांख्यिकी कामासाठी कार्यरत असलेली पदे व्यपगत न करणे व व्यपगत झालेली पदे पुनर्जिवित करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मानखुर्द–शिवाजीनगर येथे वाहनचालकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत

**(३५) ५६७६४ (२८-०४-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मानखुर्द–शिवाजीनगर (मुंबई) विधानसभा क्षेत्रातील शिवाजी सिग्नल, बैंगनवाडी सिग्नल, डंपिंग सिग्नल, वर्धमान ज्वेलर्स या ठिकाणी मोठ्या प्रमाणात रिक्षाचालक व डम्पर चालक नियमांचे उल्लंघन करुन वाहने चालवत असल्याने मोठया प्रमाणात अपघात होत असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर प्रकरणी संबंधित वाहनचालकावर व अपघातावर नियंत्रणाबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) घडलेल्या अपघातांच्या अनुषंगाने, संबंधित पोलीस ठाण्यामध्ये गुन्ह्यांची नोंद करून वाहन चालकांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.
तसेच देवनार व मानखुर्द वाहतूक विभागांमार्फत सदर ठिकाणी वाहतूक अंमलदारांची नेमणूक करण्यात येऊन मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरुध्द ई चलान कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## साकोरी (ता. जुन्नर, जि.पुणे) येथील कुकडी डावा कालवा फुटून शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

**(३६) ५६७६६ (२८-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साकोरी (ता. जुन्नर, जि.पुणे) शिवारातील कुकडी डावा कालवा फुटल्यामुळे शेतांमध्ये पाणी शिरून शेतकऱ्यांचे शेतमालाचे मोठे नुकसान झाले असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरप्रकरणी शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहे काय, त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
कुकडी प्रकल्पांतर्गत कुकडी डावा कालव्याचे आवर्तन सुरू असताना दि.०४/०१/२०२३ रोजी पहाटेच्या वेळी साकोरी ता.जुन्नर, जि.पुणे शिवारात कुकडी डावा कालवा कि.मी. २० सा.क्र.१९/३३५ स्थित निरीक्षण पथाकडील कालवा फुटला. कालव्याबाहेर पडलेला पाण्याचा प्रवाह नाल्याच्या दिशेने वाहताना मौजे, साकोरी, ता.जुन्नर, जि.पुणे या गावातील शेतजमिनीत पाणी जाऊन दोन शेतकऱ्यांच्या पिकांचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे.
(२) सदर प्रकरणी शेतकऱ्यांचे नुकसानीबाबत साकोरी तर्फे बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे या गावचे तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहायक यांनी दि.०४/०१/२०२३ रोजी संयुक्त पंचनामा केलेला आहे.

सदर शेतकऱ्यांना कालवा फुटीमुळे झालेल्या नुकसानीची रू.३०१५०/- इतक्या रकमेची नुकसान भरपाई देणेसाठीच्या प्रस्तावास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांच्या दि.२३/०६/२०२३ रोजी झालेल्या कार्यकारी समितीमध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार बाधीत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेची कार्यवाही प्रगतीत आहे
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार शहरातील पूरग्रस्त भागातील महावितरणाच्या विद्युत उपकरणांचे सुरक्षित स्थळी स्थलांतरण करण्याबाबत

**(३७) ५६८१३ (३०-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ऐन पावसाळ्यात वीज पुरवठा खंडित होऊन वसई-विरार शहराचे जनजीवन विस्कळीत होऊ नये यासाठी पूरग्रस्त भागातील महावितरणाचे वीज मीटर, ट्रान्सफॉर्मर, डीपी इत्यादी विदयुत उपकरणे सुरक्षित स्थळी हलविण्याबाबत कारवाई करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या पालघर जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक १२ मे, २०२२ आणि त्यानंतर पुन्हा दिनांक १२ जुलै, २०२२ रोजी अधीक्षक अभियंता, महावितरण, वसई यांच्याकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कारवाई करण्याचे निर्देश अधीक्षक अभियंता, वसई यांनी दिनांक २६ मे, २०२२ रोजी मान. कार्यकारी अभियंता महावितरण विरार/वसई यांना दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कार्यकारी अभियंता विरार विभाग यांनी दिनांक ०८ जून, २०२२ रोजी तात्काळ कारवाई करण्याच्या सूचना अतिरिक्त कार्यकारी अभियंता, विरार/आचोळे/नालासोपारा/वसई उपविभाग कार्यालय यांना दिल्या हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वरिष्टांकडून कारवाईबाबत आदेश असतानादेखील याकामी अद्याप कोणत्याही स्वरूपाची कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.
SSMR (System Strengthening in Metropolitan Region) (महानगर क्षेत्र प्रणाली बळकटीकरण) योजनेअंतर्गत पोल बदली करणे, आयसोलेटर बदली करणे, एरियल बंच केबल टाकणे, उच्चदाब वाहिनी क्षमता वाढ, डिस्टीब्युशन बॉक्स बदली करणे इ. रु. ७.३८ कोटी रुपयांची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. देखभाल व दुरुस्ती मध्ये एकूण रु. ४०.७६ लाखांची कामे २०२२-२३ वर्षात पूर्ण करण्यात आलेली आहेत.

सुधारित वितरण क्षेत्र योजना प्रणाली सक्षमीकरण (RDSS) योजनेंतर्गत विरार विभागाअंतर्गत एकूण रु. ३०.९० कोटींची कामे प्रस्तावित केली आहेत. योजनेच्या या घटकास केंद्र शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्राधान्याने करण्यात येईल. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) क्षेत्रातील पायाभूत सुविधा व प्रणाली मजबूत करणे योजनेअंतर्गत विरार विभागाअंतर्गत एकूण रु. १५.५७ कोटी इतक्या रक्कमेची कामे समाविष्ट असून सदर योजनेची निविदा प्रक्रिया प्रक्रियाधीन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई तालुक्यातील महावितरणच्या विदयुत वाहिन्या भूमिगत करण्याबाबत

**(३८) ५६८१५ (३०-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई तालुक्यातील महावितरणच्या विद्युत वाहिन्या भूमिगत करण्यासंदर्भात अधीक्षक अभियंता, वसई मंडळ यांनी

सन २०२१ मध्ये प्रस्ताव तयार करून तो अंतिम मंजुरीसाठी मुख्य अभियंता, (विशेष प्रोजेक्ट) प्रकाशगड, वांद्रे, मुंबई यांच्याकडे सादर केला हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदर प्रस्तावास तात्काळ मंजुरी देण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या पालघर जिल्ह्याच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०२२, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२२ आणि त्यानंतर पुन्हा दिनांक ०९ नोव्हेंबर, २०२२ रोजी मान. उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रस्तावास मंजुरी देण्यासंदर्भात कोणत्या कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.
वसई मंडळातील गावासह कोकण किनारपट्टीवरील जिल्हयातील महावितरणची वितरण व्यवस्था भूमिगत करण्याचा प्रस्ताव कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पात प्रस्तावित करण्यात आला होता.
(२) हे खरे आहे.
(३) महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) व्दारे कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्प अंतर्गत भूमिगत विद्युत वितरण प्रणाली करण्याकरिता पालघर जिल्हयासाठी रु. २०० कोटी निधीची मंजुरी दिली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि. बुलढाणा) येथील ३३/११ के. व्ही. अटाळी उपकेंद्र अंतर्गत असणा-या ११ के.व्ही. बोरी आडगाव गावठाण फिडरच्या सेप्रेशन करण्याबाबत**

**(३९) ५६९९६ (०३-०५-२०२३). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खामगाव मतदार संघातील मौजे अटाळी येथील ३३ / के.व्ही. उपकेंद्र अंतर्गत असणा-या ११ के. व्ही. बोरी आडगाव गावठाण फीडर या एकाच फीडर वरुन आडगाव, कंचनपूर, बोथकाजी, वाहाळा बु., वाहाळा खु., शहापूर, उमरा, अटाळी, पेडका, पातोंडा, विहिगाव, रामनगर अशा १३-१४ गावांना वीजपुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील ४० ते ४५ कि.मी. लांब असलेल्या उच्च दाब वीज वाहिनींवर बिघाड झाल्यास संपूर्ण १२ ते १५ गावांना विज पुरवठा खंडित होण्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) मौजे आवार येथील खामगाव नगरपरिषदच्या पाणी पुरवठा फिल्टर प्लांटचा २४ तास ३ फेज वीज पुरवठा देखील याच फीडर वरुन प्रस्तावित असल्यामुळे सदरील फीडरचे सेप्रेशन गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(४)असल्यास, बोरी आडगाव गावठाण फिडरच्या सेप्रेशन करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा पालकमंत्री, बुलढाणा व अधीक्षक अभियंता म रा वी वी म बुलढाणा याना माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान
पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
३३/११ केव्ही अटाळी उपकेंद्रातील ११ केव्ही बोरी आडगाव गावठाण वाहिनीचे विभाजन (सेप्रेशन) होवुन नव्याने कार्यान्वीत झालेल्या ११ केव्ही रामनगर वाहिनीवर Link Line चे काम पुर्ण झाल्यावर खामगाव नगरपरिषद पाणी पुरवठा फिल्टर प्लांटला २४ तास ३ फेज विज पुरवठा देण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत ३३/११ के.व्ही कोलोरी उपकेंद्रातुन निघालेल्या ११ के. व्ही टेंभुर्णा सिंगल फेजिंग वाहिनीवरुन फिल्टर प्लांटला विज जोडणी देण्यात आलेली आहे.

(४) हे खरे आहे.
(५) ३३/११ केव्ही अटाळी उपकेंद्रातील ११ केव्ही बोरी आडगाव गावठाण वाहिनीचे विभाजन (सेप्रेशन) होवून नव्याने ११ केव्ही रामनगर वाहिनी कार्यान्वीत झालेली आहे. तसेच नव्याने कार्यान्वीत झालेल्या ११ केव्ही रामनगर वाहिनीवर नगरपरिषद पाणी पुरवठया करिता ५.५ कि.मी. लांबीच्या Link Line च्या कामाचे अंदाजपत्रक जिल्हा कृषी आकस्मिक निधी (District ACF) अंतर्गत मंजूर करून त्याचे काम सुध्दा प्रगतीपथावर आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यांत्रिकी उपविभाग, पंढरपूर येथून १३ संयंत्रे सोलापूर यांत्रिकी विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत

**(४०) ५७१७६ (२८-०४-२०२३). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हा नियोजन समिती आराखड्यातून सन २०१४ साली खरेदी करण्यात आलेली १३ संयंत्रे ही यांत्रिकी उपविभाग पंढरपूर येथून सोलापूर यांत्रिकी विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील या एकमेव यांत्रिकी विभागामधील संयंत्रे हस्तांतरित केल्यामुळे नदी बंधारे, कालवे दुरुस्ती यांसारखी कामे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधितावर कारवाई करुन सदर तेरा संयंत्रे पुन्हा पंढरपूर विभागास हस्तांतरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) हो,हे म्हणणे खरे आहे,
(२) नाही. सदर सयंत्रे सोलापूर जिल्हयातील कार्यरत आहेत. तद्नंतर, पुणे व रायगड जिल्हयातील एकूण २५ संयंत्रे यांत्रिकी उपविभाग पंढरपूर यांना हस्तांतरित करण्यात आली आहेत,
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) निरंक

---

## विदर्भातील सिंचन प्रकल्पग्रस्तांना सरळ खरेदी मोबदला देण्याबाबत

**(४१) ५७२६५ (२१-०४-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासाठी सन २००० ते २०१३ या कालावधीमध्ये अमरावती विभागासह संपूर्ण विदर्भात २०० च्यावर सिंचन प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पांकरीता जमिन लवकर उपलब्ध व्हावी याकरिता शासनाने १८९४ चा भूसंपादन कायदा अस्तित्वात असतांना जून, २००६ मध्ये परिपत्रक निर्गमित करुन सरळ खरेदी पध्दतीने अंदाजे १६ हजार हेक्टर जमिन ३९ हजार रुपये ते २ लक्ष रुपये प्रति एकर या अल्पदराने शेतकऱ्यांकडून संपादित केल्या, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी सरळ खरेदी करुन दिल्या नाहीत अशा शेतकऱ्यांना मात्र भूसंपादन कायदा २०१३ अन्वये १२ ते १८ लक्ष रुपये प्रति एकर या दराने मोबदला देण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्यामुळे त्यांना भूसंपादन कायदा २०१३ अन्वये देण्यात येणाऱ्या १२ ते १८ लक्ष प्रति एकर दराने देण्यात यावा यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी बऱ्याच वर्षापासून विविध प्रकारचे आंदोलने करुन सुध्दा त्याना मोबदला देण्यात आलेला नाही, तसेच दिनांक ४ मार्च, ते १० एप्रिल, २०२२ या दरम्यान अमरावती येथे हजारो प्रकल्पग्रस्तांनी प्राणांतिक उपोषण सुरु केले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सरळ खरेदी पध्दतीने खरेदी केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीला अत्यल्प मोबदला देण्यात आला असल्यामुळे त्यांना भूसंपादन कायदा २०१३ अन्वये मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत सन २००० ते २०१३ या कालावधीत ११९ सिंचन प्रकल्पांना शासन व महामंडळ स्तरावरुन सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत.
(२) हे खरे नाही.

सन २००६ ते डिसेंबर २०१३ दरम्यान शासन परिपत्रक दिनांक ६.६.२००६ अन्वये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांर्तत सरळ खरेदीने भूसंपादनास १५०१५.२० हेक्टर जमिनीसाठी रु.१४७४.१९ कोटी अदा करण्यात आलेले आहे. मुख्य अभियंता निहाय सरासरी हेक्टरी खरेदी दर खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मु.अ | २००६-२०१३ मधील भुसंपादन (हेक्टर) | मोबदला रु. कोटी | सरासरी दर (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|
| १ | मु.अ. जसंवि अमरावती | ६५९३.०८ | ६७०.८९ | १०.१७ |
| २ | मु.अ. विप्र. जसंवि अमरावती | ६७४६.५५ | ५४५.०४ | ८.०७ |
| ३ | मु.अ. जसंवि नागपूर | १९०.२३ | २५.०६ | १३.१७ |
| ४ | मु.अ. गोप्र. जसंवि नागपूर | १४८५.३४ | २३३.२० | १५.७० |
| ५ | एकुण | १५०१५.२० | १४७४.१९ | ९.८२ |

(३) भूसंपादन कायदा-२०१३ अन्वये महामंडळांतर्गत संपादित केलेल्या जमिनीचे भूसंपादनासाठी त्या त्या वेळेच्या प्रचलीत रेडी रेकनरच्या आधारे, दर परिगणना करुन भूसंपादनाची रक्कम अदा करण्यात आलेली आहे.
(४) व (५) होय, अंशत: खरे आहे.

दि.१६ मार्च,२०२२ व दि.२७.४.२०२२ रोजी तत्कालीन मा.जलसंपदा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली होती. सन २००६ ते सन २०१३ या कालावधीत सरळ खरेदीद्वारे संपादित केलेल्या जमिनीची व मोबदल्याची माहिती पाचही महामंडळाकडून संकलित करावी असे निर्देश सदर बैठकीमध्ये देण्यात आले हाते. त्यास अनुसरुन माहिती संकलित करण्याची कार्यवाही चालू आहे. सदर माहिती प्राप्त झाल्यावर नियोजन व वित्त विभागाच्या समन्वयाने पुढील कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील कामठी शिवारात खैरी येथे बनावट डीझेल कारखान्यावर धाड टाकल्याबाबत

**(४२) ५७४०१ (३०-०४-२०२३). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर जिल्ह्यातील (जुनी) कामठी शिवारात खैरी येथे बनावट डिझेल कारखान्यावर पोलिसांनी धाड टाकून मुद्दामाल जप्त केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जप्त केलेला मुद्देमाल तपासणीकरिता न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत काय,
(३) असल्यास, या प्रकरणी प्रयोगशाळेकडून अहवाल अद्याप प्राप्त न झाल्याने कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शासनाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :**(१) होय,
नागपूर जिल्हयातील जुनी कामठी, खसाळा येथील गिल फ्रेंड ट्रान्सपोर्ट आस्थापनेच्या मोकळया आवारात अवैध्यरित्या विनापरवाना ज्वलनशील पदार्थाचे अनधिकृत संपादन करुन बेकायदेशीररित्या साठा करुन ठेवल्याचे मिळून आल्याने आरोपीविरुध्द अप.क्र.३६४/२०२२ कलम २८५, ३३६ भादंवि अन्वये दिनांक ३१.१२.२०२२ रोजी गुन्हा नोंद करुन रु.२२,८२,९००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(२) होय,
जप्त केलेला मुद्देमाल विभागीय न्यायवैद्यक प्रयोगशाळा, नागपूर यांच्याकडे दिनांक ०५.०१.२०२३ रोजी तपासणीकरिता पाठविण्यात आला आहे.
(३) व (४) विभाग़ीय न्यायवैद्यक प्रयोगशाळा, नागपूर यांचेकडून दिनांक ०६.०१.२०२३ रोजी अहवाल प्राप्त झाला असून त्यानुसार आरोपींविरुद्ध मा. न्यायालयात दिनांक २५.०४.२०२३ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्राम विद्युत व्यवस्थापकांना किमान वेतन कायद्यानुसार पगारवाढ देण्याबाबत**

**(४३) ५७४६१ (३०-०४-२०२३). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.विनोद अग्रवाल (गोंदिया), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ग्राम विद्युत व्यवस्थापकांना किमान वेतन कायद्यानुसार पगारवाढ मिळण्याबाबत तसेच यासह अन्य मागण्यांकरिता ग्राम विदयुत व्यवस्थापक तांत्रिक संघटनेच्या वतीने दिनांक २८ डिसेंबर २०२२ रोजी नागपूर विधिमंडळावर मोर्चा काढण्यात आला , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ग्राम विद्युत व्यवस्थापकांना समाजात सन्मानाने जगता यावे त्यांचा व त्यांच्या कुटुंबीयांचा उदरनिर्वाह होईल एवढी किमान वेतन कायद्यानुसार पगार वाढ करून इतर सर्व मूलभूत सेवा सुविधा देण्याबाबत शासनाने कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०८-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) ग्राम विद्युत व्यवस्थापक यांना शासन निर्णय क्र. व्ही.पी. एम.-२०१६/प्र.क्र.८/ पं.रा.-३, दि. २०.१०.२०१६ नुसार मानधन देण्यात येत आहे.
(३) महावितरण मुख्य कार्यालयाच्या संचालक (मा.सं)/ परिपत्रक/ग्रा. ऊ. मि./मानधन/२८८८१, दि. २६.११.२०२१ च्या परिपत्रकानुसार ग्राम विद्युत व्यवस्थापकांचे मानधन रु. ३०००/- वरुन रु. ५०००/- करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुरुंग (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील ग्रामस्थांना कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याबाबत**

**(४४) ५७७२६ (३०-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरुंग (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील ग्रामस्थांना गेल्या अनेक वर्षापासून कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने

पाणी पुरवठा होत नसल्याने ग्रामस्थांनी महावितरणकडे नवीन डी.पी. बसविण्याची मागणी वारंवार करुनही त्याकडे महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गावातील वरचीवाडी, गुरववाडीमध्ये केवळ ऐकेरी वीज वाहिनी असल्यामुळे गेल्या ३५ वर्षापासून त्यावर ५० घरगुती आणि २० वीज पंप जोडण्या असल्यामुळे अत्यंत कमी दाबाचा वीज पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीजेचे प्रश्न तातडीने मार्गी लावण्यात न आल्यास आंदोलन करण्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ग्रामस्थांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित महावितरण अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच नवीन डी.पी.बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.
वरचीवाडी व गुरववाडी करीता सिंगल फेज दोन वायर लघुदाब वाहिनीव्दारे वीजपुरवठा केला जात होता व सदर वाडीमध्ये ५० घरगुती वीजग्राहक आहेत. सदर वरचीवाडी व गुरववाडी येथील ग्रामस्थांनी त्यांच्या वाडीमध्ये कमी दाबाचा वीज पुरवठा होत असल्याची दि. ०७.०९.२०२२ ची तक्रार प्राप्त झाल्यानंतर शाखा अधिकारी, भांबेड यांनी क्षेत्रिय पहाणी करुन कमी दाबाच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी ६०० मी. अंतराकरिता सिंगल फेज दोन वायरचे रुपातंर थ्री फेज फोर वायर करण्याचे रु. १.१५ लाखांचे अंदाजपत्रक R&M योजने अंतर्गत सादर केले. कार्यकारी अभियंता, रत्नागिरी यांनी सदर अंदाजपत्रक मंजूर करुन सदर काम दि. २०.०२.२०२३ रोजी पूर्ण करण्यात आले आहे.
(३) हे खरे नाही.
सद्यस्थितीत याबाबत आंदोलनाची कोणतीही नोटीस/त्याबाबतचे पत्र महावितरणकडे प्राप्त झालेले नाही.
(४) महावितरणव्दारा क्षेत्रिय पहाणी करुन कमी दाबाच्या समस्येचे ६०० मी. अंतराकरिता सिंगल फेज दोन वायरचे रुपांतर थ्री फेज फोर वायर करण्याचे काम दि. २०.०२.२०२३ रोजी पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे सद्यस्थितीत ग्राहकांना दर्जेदार वीज पुरवठा होत आहे. तसेच भविष्यातील वाढ लक्षात घेऊन अतिरिक्त रोहित्राचे (नवीन डी.पी.) अंदाजपत्रक जिल्हा वार्षिक योजना (DPDC) अंतर्गत प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आले आहे. प्रशासकीय मान्यता व निधी प्राप्त होताच, सदर काम देखील पूर्ण करण्याचे नियोजित आहे. त्यामुळे महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कारवाईची आवश्यकता वाटत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील टोल (प्लाझा) येथे पोलिसांकडून बेकायदेशीर लुट होत असल्याबाबत**

**(४५) ५७७८८ (३०-०४-२०२३). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे- सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील वरवडे,सावळेश्वर (जि.सोलापूर) येथील टोल (प्लाझा) परिसरामध्ये महामार्ग पोलीस पथक कार्यरत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरवडे, सावळेश्वर टोल नाक्यावर पोलीसांकडून तपासणीच्या नावाखाली मोडनिंब महामार्ग पोलीस केंद्राच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून गेल्या अनेक वर्षापासून परजिल्हा, परराज्यातील प्रवासी,पर्यटक,यात्रेकरु मालवाहतूक करणाऱ्या वाहनधारकांची सर्व कागद पत्रे असली तरीही आर्थिक लूट करुन त्रास देत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, टोल नाक्याच्या परिसरात कोणतेही वाहन थांबत नाही, पोलीस कर्मचाऱ्यांच्या कारवाईच्या धास्तीने वाहनधारक तेथून न थाबंता जात असल्याने अनेक हॉटेल व्यवसाय चालक, कॅन्टीन, दुकाने, विक्रेत्यांचे मोठे नुकसान होत असल्याने महामार्ग पोलिसांवर बंदी घालण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०२०-२०२१ मध्ये महामार्ग पोलिसांच्या आर्थिक त्रासाला कंटाळून वाहनधारकांने दोन पोलीस कर्मचाऱ्यांचा अपघात घडवून ठार केले होते, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलीसांकडून होत असलेली बेकायदेशीर कारवाईबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
वरवडे टोल नाका, महामार्ग पोलीस मदत केंद्र मोडनिंब येथे नेमणूकीस असलेले पोलीस अधिकारी / अंमलदारांकडून वाहतूकीचे नियम मोडणाऱ्या व मा.सर्वोच्च न्यायालय रस्ता सुरक्षा समितीने अपघात टाळण्याकरीता दिलेल्या १० हेड नुसार वाहन चालक यांचेवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आलेली असून सन २०२० मध्ये २९९५०, सन २०२१ मध्ये ५०२८६ व सन २०२२ मध्ये २९२७८ केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
सन २०२० मध्ये एका टेम्पो चालकाने त्याचे वाहन अतिवेगाने चालविल्याने वाहन कंट्रोल न झाल्याने एका पोलीस अंमलदाराचा अपघात होऊन मृत्यू झाला. वाहन चालकाविरुध्द टेंभूर्णी पोलीस ठाणे गु.र.क्र.६६४/२०२० अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
तसेच सन २०२१ मध्ये एक पोलीस अंमलदार थांबलेल्या टेम्पो समोरून जात असताना त्या टेम्पोस कार चालकाने पाठीमागून जोराची धडक दिल्यामुळे अपघात होऊन पोलीस अंमलदाराचा मृत्यू झाला. सदर अपघाताबाबत टेंभूर्णी पोलीस ठाणे गु.र.क्र.४९१/२०२१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर जिल्ह्यातील लाकडी निंबोडी योजनेसाठी निधी मंजूर करून निविदा काढल्याबाबत

**(४६) ५७९७६ (३०-०४-२०२३). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सोलापूर जिल्ह्यातील लाकडी निंबोडी योजनेसाठी निधी मंजूर करून निविदा काढल्याने जिल्ह्यात संतापाची भावना निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्ह्याची वरदायिनी म्हणून उजनी धरणाचा उल्लेख केला जातो त्याप्रमाणे पाणी वाटपाचे सुत्र तयार करून नऊ सिंचनाच्या योजना तयार करण्यात आल्या त्यात सीना माढा, भीमा सीना जोड कालवा, दहिगाव उपसा सिंचन योजना, शिरापूर उपसा सिंचन योजना ,आष्टी उपसा सिंचन योजना ,बार्शी उपसा सिंचन योजना, बार्शी उपसा सिंचन योजना, सांगोला उपसा सिंचन योजना, मंगळवेढा उपसा सिंचन योजना या नऊपैकी एकही योजना अद्याप पूर्ण झाली नसताना लाकडी निंबोडी योजनेसाठी निधी मंजूर करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तयार करणाऱ्यात आलेल्या नऊ सिंचना योजना पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) भीमा (उजनी) प्रकल्पाच्या पाणी वापर नियोजनात एकूण ९ उपसा सिंचन योजना व भीमा सीना जोड कालव्यातून सीना नदीत पाणी सोडून कोल्हापूर पध्दतीचे बंधाऱ्याव्दारे उपसा करून सिंचन करण्याच्या योजनांसाठी शासन निर्णय दि.६.१०.२०२१ अन्वये भीमा (उजनी) प्रकल्पाच्या पाणी वापराच्या फेर नियोजनास मान्यता दिली आहे. सदर ९ उपसा सिंचन योजनांपैकी ६ उपसा सिंचन योजना जवळपास ७० टक्के पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित ३ योजनांपैकी लाकडी निंबोडी उपसा सिंचन योजनेस प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर निविदा प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर

प्रगतीपथावर आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे उपसा सिंचन योजना, सांगोलाच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर शासन स्तरावरून कार्यवाही सुरू असून, मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**निम्न तेरणा उपसा सिंचन योजना तात्काळ कार्यान्वित करण्याबाबत**

**(४७) ५८०८७ (२२-०५-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न तेरणा उपसा सिंचन योजना (पंप गृह क्र.१ ते ५) हि दिनांक ०१ एप्रिल, २००४ रोजी पूर्ण करून सदर योजना सिंचन व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात आली असून सन २०१२ पासून ते आजतागायतपर्यत बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना तात्काळ कार्यान्वित करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधीद्वारे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेची सिंचन क्षमता ६८९० हेक्टर असून धारशिव (उस्मानाबाद) ५७०० हेक्टर, लोहारा ८३० हेक्टर, औसा ३६० हेक्टर, असे एकूण ६८९० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर सिंचन योजनेद्वारे सिंचनासाठी ४७.३१ द.ल.घ.मी. पाणी आरक्षित असून धारशिव (उस्मानाबाद) शहरात पिण्यासाठी व औद्योगिक वसाहतीसाठी २.८३ द. ल.घ.मी.पाणी साठा आरक्षित केलेला आहे, तसेच सदर योजना पुन: कार्यान्वित करण्यासाठी लागणाऱ्या सामग्रीचे रु. १२१.२८ कोटीचे अंदाजपत्रक शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू सिंचन योजना तात्काळ कार्यान्वित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) अंशत: खरे आहे.सदर योजना दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून सदर कामाच्या दुरुस्तीचा रू.९८.१५ कोटी किंमतीचा प्रस्ताव महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.०३/०३/२०२३ अन्वये राज्य तांत्रिक सल्लागार समिती,नाशिक यांचेकडे सादर केलेला आहे.

(५) सदर प्रस्तावावर,राज्य तांत्रिक सल्लागार समिती कार्यालयाने दि.०६/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपस्थित केलेल्या त्रुटींच्या पूर्ततेची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.त्रुटी पूर्तता करून व राज्य तांत्रिक सल्लागार समिती कडून मुल्यार्पण अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासनाकडे सादर करण्यात येणा-या प्रशासकीय मान्यता प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करून दुरूस्तीची कामे हाती घेण्याचे नियोजीत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तेरणा मध्यम प्रकल्पावरील कालवा दुरुस्तीच्या कामास निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४८) ५८०९३ (२६-०४-२०२३). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तेरणा मध्यम प्रकल्पावरील कालवा दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १७.११.२०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेरणा मध्यम प्रकल्पाच्या डाव्या व उजव्या कालव्याची एकूण लांबी ३२ किलोमीटर असून मागील अनेक वर्षापासून दुरुस्ती अभावी कालव्यातून पाणी सोडले जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील काही वर्षापासून धरणात पुरेसा पाणीसाठा असून या कालव्यांची दुरुस्ती केल्यास धाराशिव तालुक्यातील तेर, रामवाडी, डकवाडी, इर्ला, दाऊतपूर, कोळेवाडी व भंडारवाडी या गावातील १,६६५ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या कालव्याच्या दुरुस्तीचे रु. ३.४२ कोटी चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून लाभक्षेत्र विकास विभागाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी मागणीच्या अनुषंगाने तेरणा मध्यम प्रकल्पावरील कालवा दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय मान्यतेसह निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
सन २०११ मध्ये तेरणा मध्यम प्रकल्पातून कालव्याद्वारे अंतिम सिंचन करण्यात आले आहे. सन २०१२ मध्ये सदर प्रकल्पावर कालव्याच्या पूर्ण लांबीवर बंद पाईपलाईनद्वारे सिंचनाचा पथदर्शी प्रकल्प पूर्ण झाला असल्याने २०१२ पासून दोन्ही कालव्याद्वारे पाणी सोडण्यात आलेले नाही. त्यामुळे कालव्याची दुरुस्ती करण्यात आली नाही.
(३)होय हे खरे आहे.
(४)होय हे खरे आहे.
तेरणा मध्यम प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्याचे विशेष दुरुस्ती अंतर्गत रु.३.४२ कोटीचे अंदाजपत्रक महामंडळ कार्यालयाचे पत्र दि.१५.०२.२०२२ अन्वये शासनास प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करण्यात आले होते.

शासन पत्र दि.१७.११.२०२२ नुसार "बंद पाईपलाईन दुरुस्तीबाबत प्रस्तावात काहीही नमूद नाही. दीर्घकाळ बंद असलेल्या वितरीकांची दुरुस्ती करण्यासाठी समर्थनीय कारणे दिसत नाहीत.यापेक्षा बंद पाईपलाईन दुरुस्त करुन ती सुरस्थितीत ठेवून वापरणे योग्य राहील. यास्तव विषयांकित प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे , असे कळविले आहे.
(५)महामंडळाने दि.०६.०२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये तेरणा मध्यम प्रकल्पाच्या उजव्या व डाव्या कालव्याच्या विशेष दुरुस्ती प्रस्तावाबाबत फेरविचार होणेस्तव सादर केलेल्या कारणमिमांसेच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १३.६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कार्यकरी अभियंता,जायकवाडी पाटबंधारे (जि.बीड) विभाग क्र.३ अधिका-यांवर कारवाई होण्याबाबत**

**(४९) ५८१९२ (३०-०४-२०२३). श्री.संजय शिरसाट (औरंगाबाद पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कार्यकरी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे (जि.बीड) येथील विभाग क्र.३ अधिकां-यावर कारवाई करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्र्यांकडे लेखी तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंगी (ता.शेवगांव, जि.अहमदनगर) येथील शासकीय मालमत्तेचे नुकसान करुन अतिक्रमण केल्याचा प्रश्न वारंवार अधिवेशनमध्ये उपस्थित होऊनही व पोलिस अधिक्षकांनी संरक्षण देऊनही सबंधित अधिका-यांनी जाणीवपुर्वक काहीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जलसंपदा विभागाच्या मालमत्तेचे नुकसान व अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तीवर जलसंपदा विभागाने अद्याप गुन्हा दाखल केलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२ बाग पिंपळगाव वसाहत यांनी तहसिलगाव शेवगांव यांना दिलेल्या पत्रामध्ये दिनांक २४ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निरीक्षण पथ १.५ व सेवा पथ ३.५ असून त्यावरील अतिक्रमण काढले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२३) :** (१) होय.

(२) नाही.

संबंधित अधिकाऱ्यांनी पोलीस संरक्षणामध्ये अतिक्रमण काढण्याचे काम दि.२०.५.२०२२ रोजी पूर्ण केले आहे.

(३) नाही.

जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत पो.स्टे.शेवगाव येथे संबंधित व्यक्तींवर दि.२८.२.२०२२ रोजी गुन्हा नोंद केलेला आहे.

(४) नाही.

पैठण उजवा कालवा प्रकल्पावरील वितरिका (चारी) क्र.५, दोन्ही बाजूचे निरिक्षण पथ (१.५मी.) व सेवा पथ (३.५ मी.) वरील अतिक्रमण दि.२०.५.२०२२ रोजी काढण्यात आले आहे, असे उप विभागीय अधिकारी, जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.२ बाग पिंपळगाव वसाहत यांनी दि.२४.०६.२०२२ च्या पत्रान्वये तहसीलदार शेवगाव यांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## नांदुरा पिंगळाई (ता. तिवसा, जि. अमरावती) येथील साठवण तलाव फुटल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(५०) ५८२६८ (३०-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा पिंगळाई (ता. तिवसा, जि. अमरावती) येथील ई-क्लास जमिनीवरील पाटबंधारे विभागाकडील साठवण तलाव फुटल्यामुळे गट नं १८,१४९,१५० जमिनीवरील पिके वाहून गेल्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच तलावाची दुरुस्ती करण्याबाबत संबंधित शेतक-यांनी कार्यकारी अभियंता यांना निवेदनाव्दारे विनंती केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी निवेदन देऊन ३ ते ४ महिन्यांचा कालावधी होऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे त्यानुसार शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबरोबरच तलावाची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०९-२०२३) :** (१) तिवसा ता. जि. अमरावती येथील नांदुरा पिंगळाई येथे सन २०१८ मध्ये जलयुक्त शिवार अभियानामार्फत साठवण तळे (१८० मी. x ८० मी.) उंची १.७८५ मी. आकाराचे साठवण तळ्याचे काम करण्यात आले आहे.सदर तळ्याची दि.०२.०६.२०२३ रोजी उपविभागीय अभियंता,अमरावती पाटबंधारे उपविभाग क्रं.१, अमरावती यांनी प्रत्यक्ष मौका पाहणी केली असता, असे दिसुन आले की, साठवण तळ्याच्या Outlet Channel च्या बांधकामाचे संधानक काम अतिवृष्टीमुळे फुटले आहे.तसेच Outlet Channel पासुन लगतच असलेल्या नाल्यात सांडव्यावरुन पाणी वाहुन जात आहे. सदरील तळ्याच्या आसपास उल्लेख केलेले गट आढळून आलेले नाहीत. त्यामुळे संबंधित गटाचे कोणतेही नुकसान साठवण तळे फुटल्यामुळे झाल्याचे दिसुन येत नाही. तसेच सन २०१८ पासुन आजपर्यंत कार्यकारी अभियंता,अमरावती पाटबंधारे विभाग,अमरावती यांचेकडे सदर प्रकरणी नुकसान भरपाई संबंधीत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.